# रब्बी ज्वारी

**उत्पादन वाढीची सूत्रे :**

| | | |
|---|---|---|
| **१) सुधारीत वाण** | : | कोरडवाहू - मालदांडी - ३५-१, परभणी मोती, फुले चित्रा, फुले अनुराधा |
| | : | बागायतीसाठी - परभणी ज्योती |
| **२) पेरणीची योग्य वेळ** | : | १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर |
| **३) बीज प्रक्रिया** | : | काणी रोगाचा आणि खोडमाशी मुळे होणारी पोंगामर कमी करण्यासाठी ३०० मेश गंधक ४ ग्रॅम आणि थायोमिथोक्झाम (क्रूझर) ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास पेरणीपूर्वी बिजप्रक्रिया करावी. |
| **४) रासायनिक खते** | : | कोरडवाहू - पेरणीच्यावेळी २०:२०:०० खत एकरी ४० किलो पेरुण घ्यावे.<br>बागायती - पेरणीवेळी एकरी २०:२०:०० खत ७५ किलो व सोबत २५ किलो म्यूरेट ऑफ पोटॅश द्यावे. |
| **५) मुलस्थानी जलसंधारण** | : | कोळपण्या संपल्यानंतर प्रत्येक चार ओळीनंतर बळीराम नांगराने एक सरी पाडून घ्यावी. |
| **६) संरक्षित पाणी** | : | पोटरी अवस्थेत एक संरक्षित पाणी दयावे. (पेरणीनंतर ५० ते ५५ दिवसांनी) |

# हरभरा

**उत्पादन वाढीची सूत्रे :**

| | | |
|---|---|---|
| **१) सुधारीत वाण** | : | कोरडवाहूसाठी - विजय<br>बागायतीसाठी - दिग्वीजय, आकाश |
| **२) बीज प्रक्रिया** | : | १) ०२ ग्रॅम कार्बेन्डॅझीम + २ ग्रॅम थायरम प्रति किलो बियाण्यास चोळावे<br>२) नंतर रायझोबियम, पी एस बी व ट्रायकोडर्मा प्रत्येकी ६ मि.ली. प्रति किलो बियाणे याप्रमाणे बीजप्रक्रिया |
| **३) पेरणीची वेळ** | : | कोरडवाहू - ऑक्टोबरच्या दूसऱ्या पंधरवाडयात<br>बागायती - १५ ऑक्टोबर ते १० नोंव्हेबर |
| **४) पेरणी** | : | पेरणी बी बी एफ वर करावी किंवा चार ओळीनंतर एक ओळ सोडून पेरणी करावी. |
| **५) रासायनिक खते** | : | पेरणीच्या वेळी डी.ए.पी. ५० किलो प्रति एकरी पेरुन दयावा. |
| **६) संरक्षित पाण्याची पाळी** | : | तूषार पध्दतीने दोन संरक्षित पाणी घ्यावे.<br>(२५ टक्के फुलोरा व घाटे भरण्याच्या अवस्थेमध्ये) |
| **७) पीक संरक्षण** | : | १) पीक एक महिन्याचे झाल्यानंतर एकरी २० पक्षीथांबे लावावेत<br>२) फूलोरा अवस्था - घाटे अळीसाठी इमामेक्टीन बेंझोएट ०४ ग्रॅम किंवा क्विनॉलफॉस २० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.<br>३) घाटे भरताना - क्लोरॅनट्रीनीलीप्रोल (कोराजन) २.५ ग्रॅम प्रति १०लिटर पाण्यातून फवारावे. (पेट्रोल पंपासाठी किटकनाशकाचे प्रमाण तिप्पट करावे.) |

# करडई

**उत्पादन वाढीची सूत्रे :**

| | | |
|---|---|---|
| **१) सुधारित वाण** | : | शारदा, परभणी - ४०, परभणी -१२ |
| **२) पेरणीची वेळ** | : | सप्टेंबरचा शेवटचा आठवडा ते ऑक्टोबरचा पहिला आठवडा |
| **३) बीजप्रक्रिया** | : | ३ ग्रॅम बावीस्टीन प्रति किलो बियाण्यास चोळावे. |
| **४) आंतरपीक पध्दती** | : | हरभरा + करडई (६ : ३) |
| **५) रासायनिक खते** | : | पेरणीच्यावेळी एकरी ४० किलो युरिया आणि ५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट पेरुन दयावे. |
| **६) पाणी व्यवस्थापन** | : | तूषार सिंचन पध्दतीने<br>पहिले पाणी ३० ते ४० दिवसानी आणि दूसरे पाणी ६० ते ६५ दिवसानी दयावे. |
| **७) पीक संरक्षण** | : | १) मावा किडीसाठी - डायमिथोएट १५ मिली प्रति १० लिटर पाणी.<br>२) पानावरील ठिपक्यासाठी डायथेन एम-४५ बुरशीनाशक २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी. |

# तुर

**तुर या पीकामधील किड व्यवस्थापन :**

| किड | फवारणीची वेळ | किटकनाशक | प्रमाण प्रति १० लिटर पाणी |
|---|---|---|---|
| शेंगा पोखरणारी किड (शेंगा पोखरणारी अळी, पिसारी पतंग, शेंगमाशी, पाने व फूले जाळी करणारी अळी) | पहिली फवारणी पिकास फुलकळी येऊ लागताच | ५ टक्के निंबोळी अर्क + ०.२५ टक्के साबन चुरा + क्विनॉलफॉस | २५ मिली + २५ ग्राम + २० मिली |
| | दुसरी फवारणी शेंगात दाणे भरताना घ्यावी. | इमामेक्टीन बेंझोएट ५ टक्के किंवा फ्ल्युबेंडामाईड ३९.३५ टक्के | ४ मिली<br>०२ मिली |

# सुर्यफल

| | | |
|---|---|---|
| **वाण** | : | मॉर्डन, इसी ६८४१४, एसएस-५६ व एलएस-११ हे सरळा वाण तसेच एलएसएफएच - ३५ महिको १,८,१७ व इतर संकरवाण पेरणीसाठी निवडावे. |
| **बियाणे** | : | संकर वाणाचे हेक्टरी ५ किलो व सरळ वाण्याचे हेक्टरी ८ ते १० किलो बियाणे पेरावे. |
| **बीजप्रक्रिया** | : | पेरणीपूर्वी बियाणास थायरम ३ ग्रॅम किंवा बावीस्टीन २ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात लावावे. |
| **पेरणीची वेळ** | : | सुर्यफुलाची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या पंधरवाडयात करावी किंवा उशीरात उशीरा ऑक्टोबर अखेर पर्यंत संपवावी. |
| **अंतर** | : | १) सुर्यफुलाच्या संकर वाणासाठी ६० x ३० सें.मी. व सरळ वाणासाठी ४५ x २२.५ सें.मी. अंतरावर टोकण पध्दतीने करावी किंवा सरळ वाणाची पेरणी तिफणीने करावयाची असल्यास ४५ से.मी. अंतरावर करावी.<br>२) पेरणीपूर्वी सरी वरंबे रिझरच्या साहयाने पाडून सरीच्या बगलेत एका ठिकाणी दोन बिया टोकाव्यात. |
| **रासायनिक खते** | : | पेरणीच्या वेळी हेक्टरी ३० किलो नत्र, ३० किलो स्फुरद आणि ३० किलो पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. |
| **विरळणी** | : | पेरणी नंतर १० ते १२ दिवसांनी पिकाची विरळणी करुन एके ठिकाणी एक जोमदार रोप ठेवावे. |
| **पाणी व्यवस्थापन** | : | १) पेरणीच्या वेळी जमिनीत भरपूर ओलावा नसल्यास प्रथम रान ओलावून घ्यावे व चांगला वापसा आल्यावर पेरणी करावी. |

# कापूस

१) पावसाचा खंड १५ ते २० दिवसाचा पडला असल्यास व पाणी देण्याची सोय असल्यास पिकास पाणी द्यावे.

२) पाऊस जास्त पडून शेतात पाणी साचले असल्यास ते पाणी शेताच्या बाहेर काढावे.

३) पिकावर बोंड अळीचा प्रादूर्भाव आढळल्यास खालील प्रमाणे उपाय करावेत.

अ) फेनप्रोपॅथ्रीन १० ई.सी. १० मिली किंवा पायरीप्रॉक्सीफेन ५ टक्के + फेनप्रोपॅथ्रीन १५ टक्के ई.सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

४) कामगंध सापाळयातील ल्यूर प्रत्येक २१ दिवसांनी बदलून घ्यावे.

५) पांढऱ्या माशीचा प्रादूर्भाव आढळल्यास डायफेन्थीरॉन ५० टक्के wp १० मि.ली. प्रति १० लि.पाण्यात मिसळून फवारावे.

६) मूळ कूजव्या रोगाचा प्रादूर्भाव आढळल्यास कॉपरऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून झाडास ड्रेंचींग करावी.

७) आकस्मिक मरची लक्षणे दिसू लागताच १.५ किलो युरिया + १.५ किलो पालाश १०० लिटर पाण्यात मिसळून १५० ते २०० मि.ली. द्रावणाची प्रति झाड आळवणी करावी. त्यानंतर ८-१० दिवसांनी २ किलो डिएपी १०० लिटर पाण्यात मिसळून हे द्रावण १५० ते २०० मिली झाडाच्या बुंध्याजवळ ओतावे व लगेचच पाणी दयावे.